पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २८/०७/२०२०

## मौजा व्यंकटापुर-आवलमारी ग्रामस्था व शासकीय आश्रमशाळा व्यंकटापुर कडुन पोलीस कुटुंबियास मदतीचा हात

उप पोस्टे व्यंकटापुर येथे सन २०१६ पासुन नेमणुकीस असलेले पोलीस शिपाई महेंद्र खुरसे यांचे दिनांक २२/०१/२०२० रोजी आरमोरी गडचिरोली रस्त्यावर दुचाकी वाहनाच्या समोर अचानक जंगली प्राणी (रान डुक्कर) आल्याने त्यास धडक लागुन खुरसे यांचा अपघात होवुन दुःखद निधन झाले. पोलीस शिपाई खुरसे हा घरचा कर्ता पुरुष असुन त्यांच्या अचानक मृत्यु झाल्याने कुटुंबावर शोककळा पसरली त्यांच्या दुःखात सहभागी होवुन सांत्वनाकरीता मौजा आवलमारी येथील ग्रामस्थ तसेच शासकीय आश्रमशाळा व्यंकटापुर येथील मुख्यध्यापक, शिक्षक, व इतर कर्मचारी या सर्वांनी मिळुन उप पोस्टे व्यंकटापुर येथे सदर पोलीस शिपाई यांचे कुटुंबीयांना ११,०००/- रोख स्वरुपात जमा करुन मदतीचा हात पुढे केले आहे.

पोलीस शिपाई महेंद्र खुरसे हे सन २००६ रोजी पोलीस दलात भरती झाले असुन ते कार्यरत असलेल्या ठिकाणी सामान्य जनतेशी सलोख्याने राहत होते. त्यांच्या मनमिळावु स्वभावामुळे लोकांशी त्यांचे चांगले संबंध निर्माण झाले होते. त्यांच्या अचानक निधनामुळे व्यंकटापुर परिसरात तसेच आप्तस्वकीया कडुन व मित्र परीवाराकडुन हळ-हळ व्यक्त होत आहे. तसेच त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी दोन लहान मुले व आई-वडील असे आप्त परीवार आहे. व्यंकटापुर येथील ग्रामस्थ व शासकीय आश्रमशाळा व्यंकटापुर यांनी निराधार झालेल्या पोलीस कुटुंबीयांना प्रथमच केलेल्या या मदती मुळे सर्व स्तरातुन त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

